# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 24/04/2021 (शनिवार)

(दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### पोलिस स्टेशन केळवदची कार्यवाही

दिनांक 23/04/2021 रोजी पोलीस निरीक्षक श्री दिलीप ठाकूर यांना मुखबिराद्वारे खबर मिळाली की, पांढुर्णा ते नागपूर जाणार्‍या हायवे रोडने महेन्द्रा बोलेरो पिकअप क्र. सिजी– 07/ बिबि– 1307 या वाहानामध्ये अवैध्यरीत्या कत्तलीसाठी गौवंशाची वाहतुक केली जात आहे. अशाखबरेवरुन पोलीस स्टॉप सहपांढुर्णा रोड हायवे क्र. 47 वरील आर टी ओ चेक पोस्ट खुर्सापार येथे नाकाबंदी लावुन वाहने चेक करीत असता दिनांक 23/04/2021 रोजी चे सकाळी 08.30 वा. दरम्यान एक महेन्द्रा बोलेरो पिकअप क्र. सिजी– 07/ बिबि– 1307 हे वाहन पांढुर्णा हायवे रोडनी येतांना दिसले. सदर वाहन नाकाबंदीचे ठिकाणी न थांबविता खुर्सापार गावाच्या दिशेने बेदारकपने पळवुन हायवे वरील जाणा–या येणा–या वाहणाना व लोकांना धोका निर्माण होईल ईतक्या वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालवु लागला. खुर्सापार गावाच्या आधी त्याच्या वाहणासमोर गड्डा आल्याने चालकाचे संतुलन बिघडल्याने त्याने आपल्या ताब्यातील वाहन रोडच्या कडेला असलेल्या झाडाला धडकविले. त्यामुळे सदर वाहणाच्या समोरील ग्लास फुटला व वाहन चालक तेसच त्याचा साथीदार बाजुच्या शेत शीवारात पळु लागले त्यांना स्टॉपच्या मदतीने ताब्यात घेतले सदर आरोपी नामे– 1) मोहम्मद सद्दाम मोहम्मद अब्दुला वय 24 वर्ष रा. कब्रस्थान रोड भानखेडा डोबीनगर छोटी लाईन सिगंल च्या जवळ मोमीनपूरा नागपूर पो.स्टे. तहसील धंदा–वाहन चालक 2) मोहम्मद कमळे आलम अंजार शेख वय 20 वर्ष रा. पिली नदी वनदेवी चौक परवेश नगर नागपूर पो.स्टे. यशोधरा नगर यांच्या वाहनाची पाहाणी केली असता सदर वाहनाचे मागील डाल्यामध्ये एकुण 10 नग गाई गौवंश जनावरे क्रुरवनिर्यदयतेने डाबुंन आखुड दोरीने बाधुंन त्यांना चारापाणी न देता अपु–या जागेत दाटीवाटीने कोबुंन जनावरांना त्रास होईल अशा स्थितीत अवैध्यरीत्या कत्तलीसाठी घेवुन जातांना दिसले. घटनास्थळावरून आरोपीतांच्या ताब्यातुन 1) 10 नग गाई गौवंश प्रत्येकी 15,000/–रुपये प्रमाणे 1,50,000/–रुपये 2) महेन्द्रा बोलेरो पिकअप क्र. सि जी 07/बि बि– 1307 किमती 5,00,000/–रुपये असा एकुण कि. 6,50,000/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोशि. धोंडुतात्या देवकते, पो.स्टे. केळवद यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11(1)(घ)(ड)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ), 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम 192 (अ),179,184 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईर्क रविंद्र चटप हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री राकेश ओला, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., मा. श्री राहुल माकणीकर अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा.,मा. श्री अशोक सरबंळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिलीप ठाकूर ,पोहवा रविद्र डोरले, नापोशी रविंद्र चटप, चानापोशी गुणवंत्ता डाखोळे पोशी सचिन येळकर, पोशी धोंडुतात्या देवकते, होम.सैनिक नानुसाव राऊत, होम सै. महेन्द्र भोयर, होम सै. डॅनियल तांडेकर सनद यांनी केली आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर